# शिकाऊ उमेदवारांसाठी जाहिर सुचना

महावितरण

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार सन २०२४-२५ साठी प्रशिक्षणार्थीची भरती करणे. अहमदनगर मंडलांतर्गत सर्व विभागांमध्ये सन २०२४-२५ या कालावधीसाठी शिकाऊ उमेदवार भरती करावयाचे आहे. त्यांची पदसंख्या तसेच अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | अनु.जाती | अनु. जमाती | इतर | एकुण |
|---|---|---|---|---|
| लाईनमन | १४ | १४ | २६४ | २९२ |
| कॉम्प्युटर ऑपरेटर | ०० | ०० | २९ | २९ |

अटी व शर्ती

१) वयोमर्यादा : वर्षे १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथील). (२) उमेदवार हा अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी असावा. (३) कामाचे ठिकाण - अहमदनगर जिल्ह्यात कोठेही (४) शैक्षणिक पात्रता : १० वी व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाचा अभ्यासक्रम मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा डिप्लोमा/आय. टी. आय. वीजतंत्री/तारतंत्री परीक्षा उत्तीर्ण तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर पदासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर ॲन्ड प्रोग्रामींग असिस्टंट परिक्षा उत्तीर्ण यांची सरासरी काढून खुल्या वर्गासाठी किमान ५५% व मागासवर्गीयांसाठी ५०% गुण आवश्यक (५) कागदपत्र जमा करणेपुर्वी अर्जदाराने शासनाच्या www.apprenticeshipindia.org या वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक (६) उमेदवाराने आपली शैक्षणिक कागदपत्रे (शाळा सोडल्याचा दाखला, १० वी उत्तीर्णचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, आय. टी. आय. /कॉम्प्युटर ऑपरेटर ॲन्ड प्रोग्रामींग असिस्टंट सर्व सत्रांचे गुणपत्रके, जातीचे प्रमाणपत्र (लागु असल्यास), आधारकार्ड व अप्रेटीस रजिस्ट्रेशन यांच्या छायांकित प्रती व सोबत मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी दि. ०५.०६.२०२४ ते ०६.०६.२०२४ रोजी सकाळी ११.०० ते १६.०० या वेळेत आणावीत. अपुर्ण कागदपत्रे/ माहिती सादर केल्यास उमेदवारास अपात्र केले जाईल. (७) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत घेणे बंधनकारक नाही. (८) जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागामध्ये अंशतः बदल किंवा संपूर्ण जाहिरात रदद् करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. (९) अहमदनगर जिल्ह्यातील उमेदवारांना प्राधान्य (१०) महावितरण कर्मचारी पाल्यास प्राधान्य.

**पत्ता- अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., मंडल कार्यालय, विद्युत भवन, स्टेशनरोड, अहमदनगर- ४१४००१.**

**पी. आर. ओ. नं. १०५.** **अधीक्षक अभियंता,महावितरण, अहमदनगर.**